## बापूंची ९ वचने

१) अनिरुद्ध क्षेत्री जो आला शरण । तयासी कैसा भय दु:ख भार ।

२) श्रद्धावान हाचि माझा मित्र सखा । तयासी मी रक्षीण देवयान पंथी ।

३) ग्रंथराज हेचि जयाचे अनुसंधान । तयाचा योगक्षेम मीची वाहे ।

४) जाण मी न कधी टाकीन तुजसि । देईन नित्य मन:सामर्थ्य बल बुद्धी ।

५) मर्यादा हाचि जयाचा तारक मार्ग । तयाचा मी आश्रय सर्वकाळ ।

६) जो जो मज स्मरे दृढभावे । तयासी आनंदघन देईन मी ।

७) मज सवे जो प्रेमे येईल । तयाचे अश्यक्य, शक्य मी करीन ।

८) तू वानर मी मित्र तुझा खचित । रावण मरणार जाण तू निश्‍चित ।

९) जेथ सेवा भक्ती शारण्य राहे । तेथ तेथ दाऊ नंदा अनिरुद्ध राहे ।

## गाऱ्हाणे

दत्तगुरुंच्या लेकरा । धाव पाव रे मला ॥
अनिरुद्धा अनिरुद्धा । मी हाक घालतो तुला ॥
फूलपान माझे वाहतो तुला । होय बापूराया ॥
अप्प्यांचा घास भरवतो तुला । होय बापूराया ॥
पाठीशी माझ्या उभा ऱ्हा देव । होय बापूराया ॥
अंधारात मार्ग दाखीव बा मला । होय बापूराया ॥
चरणांची सेवा करीन मी देवा । होय बापूराया ॥
तुझ्याशिवाय मला कोण तारील देवा ?
जय बापूराया । देवाधिदेवा । ......

## ललकारी

अनन्यप्रेमस्वरूप दत्तभक्तचूडामणि चरणाश्रितत्रितापहर ।
महापापविमोचक सर्वपुरूषार्थप्रदायक शान्तिसिंहासनस्थ ।
सद्‌गुरु श्रीअनिरुद्धसिंह की जय ॥